# प्रेस नोट

आज दिनांक २०/१२/२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजताच्या सुमारास विक्रोळी विधानसभा मतदार संघाचे आमंदार मा. सुनिल राऊत यांचे स्वीय सहाय्यक हितेश पटेल यांनी फोनद्वारे कळविले की मा. आमदार सुनिल राऊत यांचे मैत्री बंगल्यासमोर सकाळी ०९.१५ वाजाताचे सुमारास दोन संशयीत इसम मोटार सायकलवर येवुन त्यांचे घराचे रेकी करुन निघून गेल्याचे कळविले. त्यांचे सदर तक्रारीवरुन मुंबई पोलीसांनी चौकशी चालू करुन सदर घटनेची सखोल चौकशी केली असता यामध्ये आढळलेले चार इसम हे सेलप्लॅन व इन्स्टा आयसीटी सोल्युशन या कंपनीचे कर्मचारी असून ते ईरिक्सन कंपनीकडून जीओ मोबाईल नेटवर्कचे नेटवर्क टेस्ट ड्रायव्ह करीत असल्याचे चौकशी दरम्यान निष्पन्न झाले असून तशी संबधीत कंपनीकडून खात्री करण्यात आली आहे.